# नवी मुंबई महानगरपालिका
# जाहिर आवाहन

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये अनधिकृत बॅनर्स / पोस्टर्स तसेच होर्डिंग्ज वर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तरी, सर्व नागरिक / संस्था / मंडळे यांना सुचित करण्यात येते की, शहरामध्ये विनापरवानगी बॅनर्स / पोस्टर्स तसेच होर्डिंग्ज लावून व भिंती रंगवून जाहिराती करु नयेत, तसेच झाडावर कोणत्याही जाहिराती लावून इजा पोहचू नये, अन्यथा संबधितांवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायदयातंर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कांदळवनामध्ये डेब्रीज पडून कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याने मा.उच्च न्यायालयाने कांदळवनामध्ये डेब्रीज पडणार नाही व कांदळवनातील वृक्षांचा ऱ्हास होणार नाही याची दक्षता घेऊन उपाय योजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातध्ये कांदळवनाच्या ठिकाणी डेब्रीज पडत असताना, तसेच विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स / पोस्टर्स आढळल्यास त्याची माहिती नागरिकांनी महापालिकेस देण्यासाठी पुढील प्रमाणे टोल फ्री नंबर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| विभाग कार्यालयचे नाव | नोडल ऑफिसर तथा विभाग अधिकारी | टोल फ्री क्रमांक |
|---|---|---|
| बेलापूर | श्री. शशिकांत तांडेल | 1800 222 312 |
| नेरुळ | श्री. संजय तायडे | 1800 222 313 |
| वाशी | श्री. महेंद्रसिंग ठोके | 1800 222 314 |
| तुर्भे | श्रीम. अंगाई सांळूखे | 1800 222 315 |
| कोपरखैरणे | श्री.अशोक मढवी | 1800 222 316 |
| घणसोली | श्री. राजेश ठाकूर | 1800 222 317 |
| ऐरोली | श्री. तुषार बाबर | 1800 222 318 |
| दिघा | श्री. प्रकाश वाघमारे | 1800 222 319 |
| मुख्यालय | --- | 1800 222 309<br>1800 222 310 |

तसेच सुज्ञ व जागरुक नागरिक यांना जाहिर आवाहन करण्यात येते की, विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स / पोस्टर्स आढळल्यास त्याची छायाचित्रे, तसेच नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कांदळवनात डेब्रीज टाकत असताना त्याची माहिती छायाचित्रे 8422955912 या मोबाईल क्रमांकावर WhatsApp व्दारे पाठविण्यात यावी.

नवी मुंबई क्षेत्रातील सर्व रहिवाशांना जाहिर आवाहन करण्यात येते की, विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स / पोस्टर्स वर नियंत्रण ठेवण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करावे, हि विनंती.

आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका